नियमीत फौजदारी खटला क्र. **१३९/२०२२**
निशाणी क्र. **२४/क**

**<u>भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २६७(१) अन्वये</u>**
**<u>दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नाव : **रोहन भिमराव शिंदे**
वय सुमारे : २९ वर्षे,
व्यवसाय : तहसिलदार, मुरुड ( दि. १३/०६/२०२५ रोजी कार्यमुक्त )
निवासस्थान : मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>:**

दि. १२/०१/२०२२ पासून मी मुरुड येथे तहसिलदार म्हणून कार्यरत होतो व दि. १३/०६/२०२५ रोजी कार्यमुक्त झालेलो आहे. सी.आर.झेड्. प्रमाणे तक्रारी दाखल झाल्यास त्या ठिकाणी स्थळपाहणी करुन त्याबाबतची शहानिशा करुन वरिष्ठ कार्यालयाकडे अहवाल सादर केला जातो. मुरुड तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी कांदळवन आहेत. सदर तालुक्याला समुद्र किनारा असून तो खाडीलगत आहे. खाडीलगतचा भाग असल्यामुळे तेथे कांदळवन जास्त प्रमाणात आहे.

०२. मुरुड येथील गट क्र. २८५ बाबत सन २०२२ मध्ये तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रार तहसिलदार कार्यालय व उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाली होती. सदर तक्रार कांदळवन, सी.आर.झेड्. व गौण खनिज खणन व भराव अशा स्वरुपाची होती. उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी त्याबाबत स्थळपाहणी करण्याबाबत आदेश दिले होते. उपविभागीय अधिकारी, अलिबाग पर्यावरण संरक्षण कायद्याप्रमाणे उपविभागीय स्तरावरील अधिकारी आहेत. त्यांनी समितीमार्फत

स्थळपाहणीचे आदेश दिले होते. समितीमध्ये आर.एफ्.ओ. प्रादेशिक हे सदस्य सचिव आहेत.

०३. समितीच्या सदस्यासोबत आम्ही स्थळपाहणी केली होती. स्थळपाहणी करत असताना आम्हाला गट क्र. २८५ मध्ये भराव केल्याचे दिसून आले. त्या जागेचे आम्ही जी.पी.एस्. कॉर्डीनेशन घेतले. कांदळवन संदर्भात सन २००५ पासून गुगल इमेजेस कॉर्डीनेटच्या माध्यमातून आम्ही पाहात असतो. स्थळपाहणी केली त्या दिवशी कांदळवन तोडल्याचे भराव असल्यामुळे दिसून आले नाही. परंतु आर.एफ्.ओ. प्रादेशिक यांनी दिलेल्या अहवालावरुन सन २००५ व २०१० च्या गुगल इमेजेसवरुन गट क्र. २८५ मध्ये कांदळवन असल्याचे दिसून आले. त्यासंदर्भात आर.एफ्.ओ. प्रादेशिक यांनी समितीचा अहवाल उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना दिला. त्या अनुषंगाने पर्यावरण संरक्षण कायदा कलम ३ (१) व १५ अन्वये गुन्हा दाखल केला.

०४. दि. ०५/०८/२०२२ रोजी आम्ही स्थळपाहणी केली होती. सदर स्थळपाहणीमध्ये माझ्यासोबत भूमी अभिलेख विभागाचे प्रतिनिधी, आर.एफ्.ओ. प्रादेशिक यांचे प्रतिनिधी वनपाल, आर.एफ्.ओ. कांदळवन यांचे प्रतिनिधी होते. गट क्र. २८५ चा ७/१२ महाराष्ट्र सरकार फॉरेस्ट यांचे नावे आहे.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. गणेश भगत यांचेमार्फत</u>** :

वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१७/०६/२०२५.**

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१३९/२०२२**
निशाणी क्र. **२७/क**

**<u>भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २६७(१) अन्वये</u>**
**<u>दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **प्रशांत सुभाष ढगे**
वय सुमारे : ५० वर्षे, व्यवसाय : उपविभागीय अधिकारी, अलिबाग
निवासस्थान : मु. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>:**

दि. २६/०८/२०२२ रोजी मी उपविभागीय अधिकारी, अलिबाग म्हणून कार्यरत होतो. श्याम दत्तात्रेय कोतवाल यांनी मुरुड तालुक्यातील सावली गावातील गट क्र. २८५ सरकारी फॉरेस्टमध्ये मातीचा भराव करुन कांदळवन नष्ट करुन जागा ताब्यात घेतल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. ७/१२ उताऱ्याप्रमाणे कांदळवन नष्ट केल्याचे क्षेत्र २.८५ हे.आर. एवढे होते. २० गुंठ्यामध्ये अतिक्रमण केल्याची तक्रार आली होती.

०२. तहसिलदार व वनखात्याकडे आम्ही सदर तक्रार चौकशीकरीता पाठविली होती. वन विभाग व तहसिलदार यांच्या अभिप्रायावरुन आम्ही आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली. फिर्याद दाखल करण्याचा मला अधिकार आहे. माझ्या फिर्यादीमधील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. निशाणी क्र. १ मधील मजकूर बरोबर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. डी. एन्. पाटील यांचेमार्फत** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०५/०७/२०२५.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**आरोपीतर्फे वकील श्री. डी. एन्. पाटील गैरहजर असल्याने त्यांच्यामार्फत वकील श्री. महाडीक यांनी उलटतपासास परवानगी मागितली. वकील श्री. महाडीक यांना उलटतपासास परवानगी देण्यात आली.**

**उलटतपास वकील श्री. निलेश महाडीक यांचेमार्फत शपथेवर सुरु :**

०३. हे म्हणणे खरे नाही की, केसमध्ये दाखल असलेल्या फोटोमध्ये कांदळवन दिसून येत नाही. हे मला सांगता येत नाही की, झाडोरा म्हणजे कांदळवन होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, महेश ठाकूर यांच्या तक्रारीवरुन केस दाखल करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, महेश ठाकूर यांचा या केसमध्ये जबाब घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २८५ मध्ये कांदळवन होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने भराव त्यांच्या जागेत टाकला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने सरकारी जागेमध्ये भराव टाकला होता हे दाखवण्याठी माझ्याकडे तोंडी शब्दांशिवाय कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जागेवर गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी अहवालावरुन केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कांदळवन तोडले हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **२५/०९/२०२५.**

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१३९/२०२२**
निशाणी क्र. **२८/क**

**<u>भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २६७(१) अन्वये</u>**
**<u>दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **मनोज तुकाराम वाघमारे** |
| वय सुमारे | : | ३८ वर्षे, |
| व्यवसाय | : | वन परिक्षेत्र अधिकारी, तुंगारेश्वर दक्षिण |
| निवासस्थान | : | तुंगारेश्वर |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>:**

दि. २६/०८/२०२२ रोजी मी वन परिक्षेत्र अधिकारी, मुरुड म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी सावली गट क्र. २८५ या ठिकाणचा पंचनामा माझ्या समक्ष झाला होता. सॅटेलाईट इमेज गुगलवरुन पाहिल्यानंतर निदर्शनास आले की, सन २००५ नंतर गट क्र. २८५ सरकारी फॉरेस्ट मध्ये भराव झाल्याचे निदर्शनास आले. त्याप्रमाणे मी पंचनामा करुन माझा अहवाल उपविभागीय अधिकारी यांना दिला. पंचनामा वनपाल यांनी केला व माझ्याकडे दिला होता व त्याप्रमाणे मी उपविभागीय अधिकारी यांना अहवाल दिलेला आहे. अहवालाची स्थळप्रत माझ्याकडे आहे मी ती दाखल करु शकतो.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. डी. एन्. पाटील यांचेमार्फत** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०५/०७/२०२५.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.